दु.क्र.०२०-२४४७६९३८
Email-socialscience
dept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३०.

जा.क्र.राशैसंप्रपम /सा.शा./संविधान/ २०२४/05479-A दि.२२/११/२०२४

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व
२) उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, सर्व
३) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व
४) शिक्षणाधिकारी माध्यमिक / प्राथमिक/ योजना सर्व
५) शिक्षण निरीक्षक, (पश्चिम, दक्षिण व उत्तर), मुंबई
६) प्रशासन अधिकारी म.न.पा./न.पा.सर्व

विषय : संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ पासून "घर घर संविधान" कार्यक्रम साजरा करणेबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांकः बीसीएच-२०.क्र.प्र/२४२५९२-शिक्षण/ मंत्रालय विस्तार, मुंबई दिनांक: १०/१०/२०२४
२. उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र संकीर्ण २०२४/प्र.क्र.३३४/एसडी-४ दि.२२/११/२०२४
३. शालेय शिक्षा व साक्षरता विभाग, शिक्षा मंत्रालय,भारत सरकार यांचे पत्र दि.२१/११/२०२४

उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ नुसार, दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करुन दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. संविधानाचे महत्व अनेक स्तरांवर असुन भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ति, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, तसेच दर्जा व संधीची समानता प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा विचार केलेला आहे. संविधान हे एक जिवंत दस्तऐवज आहे जे देशाच्या विकासात आणि नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत महत्वपूर्ण भूमिका बजावते.

भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता, तसेच संविधानाची मुल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरिक यांच्यापर्यंत पोहचावीत यासाठी राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक / विगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले,

शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ स्वयं अर्थसहाय्यित शाळा/ आश्रमशाळा व वसतिगृहे तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय संविधानास ७५ वर्ष पुर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृतमहोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव "घर घर संविधान" साजरा करणे संदर्भात कळविले आहे.

तदनुषंगाने शालेय स्तरावर खालील उपक्रमांचे आयोजन **दि.२६नोव्हेंबर, २०२४ ते दि.२६ जानेवारी, २०२५** या कालावधीत करावे.

| अ.क्र. | उपक्रम | स्वरूप/ कार्यवाही |
|---|---|---|
| १ | शाळा/महाविद्यालय / वसतिगृहे यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे. | कायम स्वरूपी लावण्यात यावी. |
| २ | शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान प्रास्ताविका/उद्देशिकचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेणे. | कायम चालू ठेवणे आवश्यक आहे. |
| ३ | शालेय वाचनालयात संविधानाच्या किमान पाच प्रती विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करवून देणे | शालेय ग्रंथालयात इंग्रजी/ मराठी किमान ५ प्रती ठेवण्यात याव्यात. |
| ४ | भारतीय संविधान बाबत सर्वसाधारण माहिती देणे, जसे, निर्मिती, निर्मिती समिती, अनुच्छेद, विशेषता, कर्तव्ये यावर व्याख्यान (किमान ६० ते ९० मिनिटे) | तज्ञ मार्गदर्शक किंवा शाळेतील शिक्षक यांनी माहिती देणे आवश्यक आहे. |
| ५ | विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, हक्क, आणि कर्तव्ये यांवर मार्गदर्शन करणे. | तज्ञ मार्गदर्शक किंवा शाळेतील शिक्षक यांनी माहिती देणे आवश्यक आहे. |
| ६ | कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना संविधानाचे तत्त्वज्ञान आणि मूल्ये समजावून सांगणे. | विषय तज्ञांचा एक गट तयार करून त्यांनी कार्यशाळेत घेण्यात येणारे उपक्रम प्रथमतः तपासावेत व प्रमाणित करावेत. |
| ७ | संविधान मुल्ये यावर पथनाट्य तयार करणे. | विषय तज्ञांचा एक गट तयार करून त्यांनी संविधान मूल्ये यावर तयार केलेले पथनाट्य प्रथमतः तपासावे व प्रमाणित करावे. |
| ८ | शाळा/महाविद्यालयात संविधानाच्या विविध मुद्यांवर फलक, पोस्टर, आणि प्रदर्शन आयोजित करणे. | विषय तज्ञांचा एक गट तयार करून त्यांनी संविधानासंबंधित फलक, पोस्टर व प्रदर्शन प्रथमतः तपासावे व प्रमाणित करावे. |

| | | |
|---|---|---|
| ९ | संविधान दिन कार्यक्रम आयोजित करणे, ज्यात पथनाट्य आणि पोस्टर प्रदर्शन याचा समावेश करावा. | विषय तज्ञांचा एक गट तयार करून त्यांनी संविधानासंबंधित फलक, पोस्टर व प्रदर्शन प्रथमतः तपासावे व प्रमाणित करावे. |
| १० | संविधानावर आधारित निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा इत्यादी उपक्रमांचे आयोजन करणे. | विषय तज्ञांचा एक गट तयार करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली नमूद उपक्रम राबवावेत. |
| ११ | प्रजासत्ताक दिनी संविधानातील मुल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण. (जसे देशभक्तिपर गाणी, नाटक, आणि नृत्य) | विषय तज्ञांचा एक गट तयार करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण करण्यात यावे. |

संदर्भ क्र.३ नुसार, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, नवी दिल्ली यांच्याकडून २६ नोव्हेंबर, संविधान दिनी एक मॉड्यूल DIKSHA प्लॅटफॉर्मवर अपलोड करण्यात येणार आहे. दि. २६.११.२०२४ रोजी संविधान दिन साजरा करण्यासाठी आणि त्यानंतरच्या उपक्रमांसाठी हे मॉड्यूल संदर्भ म्हणून वापरण्यात यावे. तसेच PM-eVidya प्लॅटफॉर्मवर संविधान दिनानिमित्त एक व्हिडिओ देखील अपलोड केला जाईल, तो व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवण्यात यावा. त्याचप्रमाणे MyGov पोर्टलवर प्रश्नमंजुषा अपलोड केली जाईल. सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक व पर्यवेक्षीय यंत्रणेतील सर्व अधिकारी MyGov पोर्टलवर लॉग इन करून सदर प्रश्नमंजुषा सोडवावी. तसेच सर्व शाळांनी आयोजित केलेले विविध उपक्रमांचे फोटो, व्हिडिओ काढून (Geo Tagging Camera चा वापर करून) MyGov पोर्टलवर अपलोड करावे.

(राहूल रेखावार भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे३०.

प्रत माहितीस्तव:

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई

मा. आयुक्त, शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे